## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/१०/२०१६

**१) ट्रॅक्टर भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन, एक जखमी . :–**

दिनांक २२/१०/२०१६ रोजी १८.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉलीचे हिचवर विनोद योगराज भेंडारकर वय ३० वर्ष. रा. सुकळी यास बसवुन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन नेत असतांना जखमी हा हिच वरुन पडुन त्यांस गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यशराम कवळुजी शेंडे वय ४७ वर्ष, रा. वळद यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरून मारहाण करून जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक २३/१०/२०१६ रोजी १०. १५ वा. दर. यातील फिर्यादी आशिष गंगाधर मेश्राम वय २६ वर्ष, रा. संगम पिपरी पु. मुजबी हा भावासोबत त्याची गाय ओटयावरुन गाडीवर चढवित असतांना यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन ओटयावर गाय का चढविता या कारणा वरुन भांडण करुन फिर्यादी व त्याचे भावास काठीने आरोपी क्र. ०१ ने हाता बुक्यांनी मारहाण करुन जखमी करुन जिवाने मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) विहीरीत बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. २२/१०/२०१६ रोजी २१.०० वा. ते २३/१०/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील मृतक सेवकराम दयाराम कुंभलकर वय ४५ वर्ष, रा. बाम्पेवाडा हा रात्री आपल्या परिवारासह जेवन करुन खर्रा खावुन येतो असे म्हणुन घरुन निघुन गेला असता रात्री घरी परत आला नाही त्याचा शोध घेतला असता दि. २३/१०/२०१६ रोजी ११.०० वा. दर. ग्रा. पं. चे सार्वजनीक विहीरीत काटेरी गढ घातले असता मृतक हा मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी रामकृष्ण दयाराम कुंभलकर वय ६० वर्ष, रा. बाम्पेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. डोंगरवार पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २३/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९० प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तसेच तिन सिटर वाहनांवरती ०२ केसेस व ईतर वाहनांवरती ८६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**(बी. आर. गाडे)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.